ePaper
जोसेफ विजय यांना स्टॅलिन यांचं जोरदार प्रत्युत्तर; व्हायरल व्हिडीओवरही भाष्य
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
WWW.MAHAENEWS.COM | गुरुवार, दि. 25 जून 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 2 वरुन...
आळंदी बस स्थानकाचा पहिल्याच पावसात बोजवारा

## राज्यभर पावसाची जोरदार हजेरी, नागरिकांना दिलासा

# अखेर राज्यभरात मॉन्सून दाखल!

महाईन्यूज । मुंबई

**दोन आठवड्यांहून अधिक काळ एकाच ठिकाणी स्थिरावल्याने चिंतेचे वातावरण निर्माण करणाऱ्या नैऋत्य मान्सूनने अखेर पुन्हा वेग पकडला आहे. सोमवारपासून पुढे सरकण्यास सुरुवात केलेल्या मान्सूनने अवघ्या दोन दिवसांत संपूर्ण महाराष्ट्र व्यापला असून गुजरात आणि मध्यप्रदेशच्या काही भागांपर्यंतही प्रगती केली आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागाने बुधवारी दिली. त्यामुळे राज्यभर पावसाचा जोर वाढला असून अनेक भागांत मुसळधार पाऊस कोसळत आहे. परिणामी, गेल्या काही दिवसांपासून जाणवत असलेल्या उष्णतेपासून नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.**



यंदाच्या मान्सूनने तळकोकणात प्रवेश केल्यानंतर वेगाने हर्णे आणि सोलापूरपर्यंत मजल मारली होती. मात्र, त्यानंतर वातावरणातील प्रतिकूल स्थितीमुळे त्याची उत्तर सीमा जवळपास दोन आठवडे एकाच ठिकाणी स्थिर राहिली. जून महिन्याच्या मध्यावरही राज्याच्या मोठ्या भागात मान्सून पोहोचला नसल्याने शेतकरी, कृषी क्षेत्र तसेच सर्वसामान्य नागरिकांमध्ये चिंता वाढली होती. खरीप हंगामाच्या पेरण्या रखडण्याची शक्यता व्यक्त केली जात होती.

मात्र, सोमवारपासून वातावरणात अनुकूल बदल झाल्याने मान्सूनने पुन्हा वेगाने वाटचाल सुरू केली. अपेक्षेपेक्षा अधिक गतीने पुढे सरकत त्याने अवघ्या दोन दिवसांत उर्वरित महाराष्ट्र व्यापला. त्याचबरोबर गुजरात आणि मध्यप्रदेशच्या काही भागांपर्यंतही मान्सून पोहोचल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

गेल्या २४ तासांत कोकण, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील अनेक जिल्ह्यांत जोरदार ते मुसळधार पाऊस झाला. काही ठिकाणी १०० मिलिमीटरपेक्षाही अधिक पर्जन्यमानाची नोंद झाली आहे. कोकण विभागात पावसाचा सर्वाधिक प्रभाव दिसून आला असून रायगड, अलिबाग, सातारा आणि लातूर परिसरातही मुसळधार पावसाने हजेरी लावली. अनेक नद्या-नाल्यांच्या पाणीपातळीत वाढ झाली असून ग्रामीण भागात शेतीच्या कामांना वेग आला आहे.

हवामान विभागाने पुढील तीन दिवस राज्यातील अनेक भागांत पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. विशेषतः कोकण, घाटमाथा, मध्य महाराष्ट्रातील काही भाग तसेच विदर्भातील काही जिल्ह्यांत मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. त्यामुळे नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे.

### ७ दिवस उशिरा राज्यभर मान्सून

यंदा मान्सूनने संपूर्ण महाराष्ट्र व्यापण्यासाठी गेल्या वर्षाच्या तुलनेत सात दिवस अधिक घेतले. २०२५ मध्ये मान्सूनने १७ जूनपर्यंत संपूर्ण राज्य व्यापले होते, तर यंदा तो जूनच्या अखेरीस राज्यभर पोहोचला. १ ते २३ जूनदरम्यान राज्यात सरासरीच्या तुलनेत ७२ टक्के कमी पावसाची नोंद झाली होती. मात्र, गेल्या दोन दिवसांतील दमदार प्रगतीमुळे मान्सूनने संपूर्ण राज्य व्यापले असून पुढील काही दिवस जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

### दोन दिवसात संपूर्ण राज्य व्यापले

मान्सूनने तळकोकणात प्रवेश केल्यानंतर पुढील दोन दिवसात हर्णे आणि सोलापूरपर्यंत प्रवास केला होता. मात्र, त्यानंतर त्याची राज्यातील वाटचाल दोन आठवडे एकाच जागी स्थिर होती. हवामान स्थिती अनुकूल असल्याने मान्सूनने वेगात वाटचाल करून अवघ्या दोन दिवसात संपूर्ण राज्य व्यापले आहे. मागील चोवीस तासात कोकण प्रदेश, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातील काही भागाला पावसाने झोडपले आहे. काही भागात १०० मिमीहून अधिक पावसाची नोंद झाली असून पुढील तीन दिवस पावसाचा जोर कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.



जून महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात राज्यात पावसाची मोठी तूट होती. १ जून ते २३ जून या कालावधीत राज्यात सरासरीच्या तुलनेत सुमारे ७२ टक्के कमी पावसाची नोंद झाली. त्यामुळे पाणीसाठे, शेती आणि पिण्याच्या पाण्याबाबत चिंता व्यक्त केली जात होती. मात्र, आता मान्सून सक्रिय झाल्याने ही तूट काही प्रमाणात भरून निघण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

गेल्या वर्षी मान्सूनने २६ मे रोजी मुंबईत प्रवेश केला होता. त्यानंतर काही दिवस त्याची वाटचाल मंदावली असली तरी १७ जूनपर्यंत संपूर्ण महाराष्ट्र मान्सूनच्या प्रभावाखाली आला होता. यंदा मात्र संपूर्ण राज्य व्यापण्यासाठी मान्सूनला सात दिवस अधिक लागले आहेत. तरीही आता राज्यभर पावसाचा जोर वाढल्याने खरीप हंगामाला चालना मिळणार असून शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. पेरण्यांना वेग येण्यास मदत होणार असून धरणांच्या पाणीसाठ्यातही वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. दरम्यान, पावसामुळे राज्यातील बहुतांश भागातील कमाल तापमानात लक्षणीय घट झाली असून उकाड्यापासून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. आगामी काही दिवसांतही राज्यातील बहुतांश भागात ढगाळ वातावरणासह जोरदार पावसाची शक्यता कायम असल्याचे हवामान विभागाने स्पष्ट केले आहे.

# आळंदी बस स्थानकाचा पहिल्याच पावसात बोजवारा

## सर्वत्र चिखल आणि डबकी; महिला, ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांचे हाल



**महाईन्यूज । पुणे**

**अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर आळंदी आणि परिसरात झालेल्या पहिल्याच पावसाने बळीराजासह नागरिकांना दिलासा दिला. मात्र, याच पावसाने आळंदीतील नव्याने सुरू करण्यात आलेल्या तात्पुरत्या बस स्थानकातील व्यवस्थेची पोलखोल केली. संपूर्ण परिसरात चिखल आणि पाणी साचल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत असून, पीएमपीएमएल प्रशासनाविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.**

देहू फाटा वाय जंक्शन परिसरातील राज्य परिवहन महामंडळाच्या जागेत सुमारे तीन महिन्यांपूर्वी तात्पुरत्या स्वरूपात नवीन बस स्थानक सुरू करण्यात आले आहे. या ठिकाणाहून पुण्याकडे जाणाऱ्या पीएमपीएमएलच्या बससेवा सुरू आहेत. मात्र, बसस्थानकावर प्रवाशांसाठी पत्र्याचे शेड, बसण्याची व्यवस्था, पावसापासून संरक्षण, तसेच पुरेशी प्रकाशव्यवस्था अशा कोणत्याही मूलभूत सुविधा उपलब्ध नसल्याने प्रवाशांना आधीपासूनच अडचणींचा सामना करावा लागत आहे.

पहिल्याच पावसानंतर बस स्थानक परिसरात मोठ्या प्रमाणात चिखल व पाणी साचले. परिणामी, बसमध्ये चढताना आणि उतरताना प्रवाशांना मोठी कसरत करावी लागत असून, ज्येष्ठ नागरिक, महिला आणि विद्यार्थ्यांची विशेष गैरसोय होत आहे. चिखलातून वाट काढत प्रवास करावा लागत असल्याने अपघाताचीही भीती व्यक्त केली जात आहे.

पावसाळ्याची नुकतीच सुरुवात झाली असून पुढील काही महिने ही समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बस स्थानक परिसरात तातडीने निवारा शेड उभारणे, खडी टाकून चिखलमुक्त व्यवस्था करणे, पाण्याचा निचरा करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे, अशी मागणी प्रवाशांनी पीएमपीएमएल प्रशासनाकडे केली आहे. प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन प्रवाशांचा त्रास कमी करावा, अशी अपेक्षाही नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### वाशांच्या प्रमुख मागण्या

आळंदी बस स्थानक परिसरात तातडीने पत्र्याचे शेड उभारावे, चिखल टाळण्यासाठी खडी टाकावी, साचलेल्या पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी, बसण्यासाठी बाके व पुरेशी प्रकाशयोजना उपलब्ध करून द्यावी, तसेच पावसाळ्यात प्रवाशांना सुरक्षित व सुविधायुक्त प्रवासासाठी आवश्यक मूलभूत सुविधा त्वरित उपलब्ध करून द्याव्यात, अशी आग्रही मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.



# पावसाने पुणे जाम!

**महाईन्यूज । पुणे**

शहरात सुरू असलेल्या संततधार पावसामुळे बुधवारी जनजीवनावर परिणाम झाला असून प्रमुख रस्त्यांवरील वाहतूक विस्कळीत झाली. रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने आणि वाहनांची संख्या वाढल्याने अनेक ठिकाणी वाहतूक संथगतीने सुरू होती. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी वाहतूक पोलिसांकडून अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

मंगळवारी सायंकाळपासून सुरू झालेला पाऊस रात्रभर कायम होता. बुधवारी सकाळी आठनंतर पावसाचा जोर आणखी वाढल्याने शाळकरी विद्यार्थी, नोकरदार आणि नागरिकांना पावसातच प्रवास करावा लागला. सकाळच्या गर्दीच्या वेळी मोठ्या प्रमाणात वाहने रस्त्यावर आल्याने शहरातील प्रमुख मार्गांवर वाहतूक कोंडी झाली.सिंहगड रस्ता, कर्वे रस्ता, अहिल्यानगर रस्ता, गणेशखिंड रस्ता, पुणे-सोलापूर रस्ता, पुणे-सातारा रस्ता तसेच बाह्यवळण मार्गावरील वारजे पूल परिसरात वाहतुकीचा वेग मंदावला. अनेक ठिकाणी खड्ड्यांमध्ये पाणी साचल्याने वाहनचालकांना वाहने चालविताना अडचणींचा सामना करावा लागला. परिणामी शहरातील बहुतांश प्रमुख रस्त्यांवर वाहतूक संथगतीने सुरू होती.

वाहतुकीवरील ताण लक्षात घेऊन प्रमुख चौकांमध्ये अतिरिक्त पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले असून वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी नियोजन करण्यात येत असल्याची माहिती वाहतूक शाखेतील अधिकाऱ्यांनी दिली.

### द्रुतगती मार्गावरही वाहतुकीचा वेग मंदावला

लोणावळा व मावळ तालुक्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाचा परिणाम मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील वाहतुकीवरही झाला. विशेषतः घाट विभागात वाहनांच्या रांगा लागल्या असून वाहतूक संथगतीने सुरू होती. वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी महामार्ग पोलिसांनी घाट परिसरासह द्रुतगती मार्गावर अतिरिक्त पोलीस कर्मचारी तैनात केल्याची माहिती महामार्ग पोलीस नियंत्रण कक्षाकडून देण्यात आली.

# महाटीईटी २०२६ : परीक्षार्थींसाठी महत्त्वाच्या सूचना जारी

**महाईन्यूज । पुणे**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे रविवारी (२८ जून) होणाऱ्या महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) २०२६च्या पार्श्वभूमीवर परीक्षार्थींसाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत. परीक्षा पारदर्शक, शिस्तबद्ध आणि सुरळीत वातावरणात पार पडावी, यासाठी उमेदवारांनी नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन परिषदेने केले आहे.**

परीक्षार्थींनी परीक्षा सुरू होण्यापूर्वी किमान दीड तास अगोदर परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्रवेशासाठी परिषदेच्या संकेतस्थळावरून डाउनलोड केलेले मूळ प्रवेशपत्र तसेच आधार कार्ड, मतदान ओळखपत्र, पासपोर्ट, पॅन कार्ड किंवा ड्रायव्हिंग लायसन्स यापैकी कोणतेही एक मूळ ओळखपत्र आणि त्याची छायांकित प्रत सोबत आणणे बंधनकारक करण्यात आले आहे. आवश्यक कागदपत्रे नसल्यास परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.



### परीक्षार्थींसाठी महत्त्वाच्या सूचना

परीक्षा केंद्रावर किमान दीड तास अगोदर उपस्थित राहावे. मूळ प्रवेशपत्र, वैध ओळखपत्र व त्याची छायांकित प्रत सोबत ठेवणे बंधनकारक आहे. परीक्षा कक्षात केवळ बॉलपेन व पारदर्शक पाण्याची बाटली नेण्यास परवानगी असेल. मोबाईल, बॅग, पुस्तके, नोट्स व इतर इलेक्ट्रॉनिक साहित्य आणण्यास सक्त मनाई असून बूट-मोज्यांऐवजी चप्पल किंवा सँडल वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

परीक्षा कक्षात केवळ प्रवेशपत्र, वैध ओळखपत्र, त्याची प्रत, काळ्या किंवा निळ्या शाईचे बॉलपेन आणि पारदर्शक पाण्याची बाटली नेण्यास परवानगी असेल. बॅग, पर्स, पुस्तके, नोट्स, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक साहित्य किंवा इतर कोणत्याही वस्तूंना सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच उमेदवारांनी बूट आणि मोज्यांऐवजी चप्पल, सँडल किंवा हलकी पादत्राणे वापरावीत, असेही परिषदेने स्पष्ट केले आहे.

# फायर सेफ्टीकडे दुर्लक्ष; कोचिंग क्लासेस धोक्याच्या छायेत

## सुरत, लखनौ दुर्घटनांनंतरही धडा नाही; अग्निशमन विभागाचा गंभीर इशारा

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहरात खासगी कोचिंग क्लासेस आणि प्रशिक्षण संस्थांचे जाळे झपाट्याने वाढत असताना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अनेक संस्थांमध्ये अग्निसुरक्षेच्या नियमांकडे दुर्लक्ष होत असल्याचे निरीक्षण अग्निशमन विभागाने नोंदवले असून, वेळीच उपाययोजना न केल्यास मोठी दुर्घटना घडू शकते, असा इशारा विभागाने दिला आहे.**



औद्योगिक आणि शैक्षणिक केंद्र म्हणून विकसित झालेल्या पिंपरी-चिंचवडमध्ये स्पर्धा परीक्षा, जेईई-नीट, एमपीएससी-यूपीएससी, बँकिंग, आयटी आणि कौशल्य विकास प्रशिक्षण देणाऱ्या शेकडो संस्था कार्यरत आहेत. या संस्थांमध्ये दररोज हजारो विद्यार्थी ये-जा करतात. मात्र, अनेक क्लासेस व्यावसायिक संकुल आणि बहुमजली इमारतींमध्ये सुरू असून, अग्निसुरक्षेच्या मूलभूत निकषांचे पालन होत नसल्याचे दिसून येत आहे.

मर्यादित जागेत क्षमतेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना बसविणे, आपत्कालीन निर्गमन मार्ग अपुरे असणे, जिने व कॉरिडॉरमध्ये अडथळे, कालबाह्य अग्निशामक यंत्रणा, बंद फायर अलार्म प्रणाली आणि विद्युत यंत्रणांची नियमित तपासणी न होणे अशा त्रुटी अनेक ठिकाणी आढळत आहेत. अशा परिस्थितीत आग लागल्यास काही मिनिटांचा विलंबही मोठ्या जीवितहानीस कारणीभूत ठरू शकतो, असा इशारा तज्ज्ञांनी दिला आहे.

अग्निशमन विभागाने प्रत्येक संस्थेत कार्यरत अग्निशामक यंत्रणा, फायर अलार्म, आपत्कालीन प्रकाश व्यवस्था, धूर नियंत्रण प्रणाली, सुरक्षित निर्गमन मार्ग आणि नियमित मॉक ड्रिल अनिवार्य करण्याची गरज व्यक्त केली आहे. तसेच विद्यार्थी व कर्मचाऱ्यांना आपत्कालीन परिस्थितीत कसे वागावे, याचे प्रशिक्षण देणेही आवश्यक असल्याचे सांगितले आहे.

> “ कोचिंग क्लास, प्रशिक्षण संस्था आणि शैक्षणिक केंद्रांनी अग्निसुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. फायर ऑडिट, अग्निशामक यंत्रणांची नियमित तपासणी, आपत्कालीन मार्ग मोकळे ठेवणे आणि मॉक ड्रिल घेणे बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड करू नये.
>
> **- ऋषिकांत चिपाडे, केंद्र अधिकारी, अग्निशमन विभाग, पिंपरी-चिंचवड**

२०१९ मध्ये गुजरातमधील सुरत येथील तक्षशिला आर्केडमधील आगीत २२ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला होता. अलीकडे लखनौमधील प्रशिक्षण संस्थेशी संबंधित इमारतीतील आगीत १५ जणांचा मृत्यू झाला. पिंपरी-चिंचवडमध्येही १ डिसेंबर २०२५ रोजी पिंपळे सौदागर येथील एका कोचिंग क्लासमध्ये आग लागली होती. त्यावेळी अग्निशमन दलाने वेळीच धाव घेत ४२ विद्यार्थ्यांसह इतर नागरिकांची सुरक्षित सुटका केली होती.

अग्निशमन विभागाचे केंद्र अधिकारी ऋषिकांत चिपाडे यांनी सांगितले की, कोचिंग क्लासेस, प्रशिक्षण संस्था आणि शैक्षणिक केंद्रांनी फायर ऑडिट, अग्निशामक यंत्रणांची नियमित तपासणी, आपत्कालीन मार्ग मोकळे ठेवणे आणि मॉक ड्रिल यांसारख्या नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

### विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य हवे

पिंपरी-चिंचवडमधील कोचिंग क्लासेस आणि प्रशिक्षण संस्थांनी अग्निसुरक्षेचे नियम केवळ कागदोपत्री न ठेवता त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. प्रत्येक संस्थेत कार्यरत अग्निशामक यंत्रणा, फायर अलार्म, सुरक्षित आपत्कालीन निर्गमन मार्ग, नियमित फायर ऑडिट आणि मॉक ड्रिल अनिवार्य करण्यात यावेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड न करता संबंधित यंत्रणांनी नियमित तपासणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी व्यक्त होत आहे.

# पिंपरीची कन्या भारतीय वायुसेनेत फ्लाइंग ऑफिसर

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**दहावीत असताना मित्र-मैत्रिणींनी भविष्यात काय बनणार, असा प्रश्न विचारला असता, आकाशातून जाणाऱ्या विमानाकडे पाहून ‘मी पायलट बनणार’ असे स्वप्न पाहणाऱ्या पिंपरीतील निधी सुधीर अग्रवाल हिने ते स्वप्न साकार केले आहे. मासुळकर कॉलनी परिसरातील महिंद्रा रॉयल सोसायटीत राहणाऱ्या निधीची भारतीय वायुसेनेत फ्लाइंग ऑफिसर (वैमानिक) म्हणून नियुक्ती झाली आहे.**



हैदराबाद येथील डुंडीगल येथील एअर फोर्स अकादमीत १३ जून रोजी झालेल्या दीक्षांत समारंभात संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह यांच्या उपस्थितीत निधीने फ्लाइंग ऑफिसर म्हणून जबाबदारी स्वीकारली.

निधीचे शालेय शिक्षण मासुळकर कॉलनीतील अजमेरा इंग्लिश स्कूलमध्ये झाले. दहावीत तिने ९३ टक्के गुण मिळवले. त्यानंतर जय हिंद महाविद्यालयातून बारावी आणि आकुर्डीतील डॉ. डी. वाय. पाटील महाविद्यालयातून संगणक अभियांत्रिकीची पदवी पूर्ण केली. कॅम्पस प्लेसमेंटमधून तिची बहुराष्ट्रीय कंपनीत सॉफ्टवेअर डेव्हलपर म्हणून निवड झाली. मात्र, देशसेवेची ओढ आणि सैन्यदलात अधिकारी होण्याचे स्वप्न तिने कायम जपले.

नोकरी करत असतानाच तिने सैन्यदलाच्या स्पर्धा परीक्षा दिल्या आणि तिन्ही दलांच्या निवड प्रक्रियेत यश मिळवले. मार्च २०२४ मध्ये भारतीय नौदलात सब-लेफ्टनंट म्हणून रुजू झाल्यानंतर अवघ्या दोन महिन्यांत भारतीय वायुसेनेत वैमानिक म्हणून तिची निवड झाली. त्यानंतर नौदलाचा राजीनामा देत ती १ जानेवारी २०२५ रोजी वायुसेनेच्या प्रशिक्षणासाठी रवाना झाली.

खडतर प्रशिक्षण, शिस्तबद्ध जीवनशैली, अथक मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर तिने वैमानिक प्रशिक्षण यशस्वीपणे पूर्ण केले. तिच्या या यशात आई निरुपमा अग्रवाल, वडील सुधीर अग्रवाल यांचे मोलाचे योगदान असून कर्नल संदीप चेट्टी, माजी कमोडोर योगेश चौधरी आणि कर्नल खांडेकर यांनी तिला मार्गदर्शन केले.

निधीचे वडील सुधीर अग्रवाल म्हणाले, “निधीने आमच्या कुटुंबाचे स्वप्न पूर्ण केले आहे. तिच्या यशामुळे कुटुंबासह समाज आणि देशाचा गौरव वाढला असून तिचा आम्हाला सार्थ अभिमान आहे.”

### स्वप्नातून साकारली आकाशभरारी

दहावीत असताना ‘मी पायलट बनणार’ असे स्वप्न पाहणाऱ्या निधी अग्रवाल यांनी ते प्रत्यक्षात साकार केले. संगणक अभियंता म्हणून बहुराष्ट्रीय कंपनीतील आकर्षक नोकरी सोडून त्यांनी देशसेवेचा मार्ग निवडला. भारतीय नौदलात सब-लेफ्टनंट म्हणून सेवा बजावल्यानंतर भारतीय वायुसेनेत फ्लाइंग ऑफिसर म्हणून त्यांची निवड झाली. जिद्द, कठोर परिश्रम आणि शिस्तबद्ध प्रशिक्षणाच्या बळावर त्यांनी पिंपरी-चिंचवडच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.



## भूमिका

**लखनौमधील एका व्यावसायिक इमारतीला लागलेल्या भीषण आगीत १५ जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेत काही पाळीव प्राण्यांचाही होरपळून मृत्यू झाला. ही घटना केवळ दुर्दैवी अपघात नसून, निष्काळजीपणा, भ्रष्टाचार आणि अग्निसुरक्षेच्या नियमांकडे केलेल्या दुर्लक्षाचा परिणाम आहे.**

# अग्निसुरक्षेच्या नावाने नागरिकांच्या जीवाशी खेळ

विशेष म्हणजे, दक्षिण दिल्लीतील रेस्टॉरंटमधील भीषण आगीनंतर अवघ्या काही आठवड्यांतच ही दुर्घटना घडली. त्यामुळे अशा घटना अपवाद नसून देशातील अग्निसुरक्षा व्यवस्थेतील गंभीर त्रुटी अधोरेखित करतात.

देशात आगीच्या घटना सातत्याने घडत आहेत. प्रत्येक दुर्घटनेनंतर चौकशीचे आदेश, मदतीच्या घोषणा आणि जबाबदारी निश्चित करण्याची आश्वासने दिली जातात; मात्र काही दिवसांनी सर्व काही पूर्ववत होते. त्यामुळे अशा दुर्घटना पुन्हा घडतात आणि निष्पाप नागरिकांना जीव गमवावा लागतो.



इमारतींच्या बांधकामावेळी अग्निसुरक्षेचे नियम पाळले जातात का, याकडे अनेकदा दुर्लक्ष होते. आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग, स्मोक डिटेक्टर्स, स्प्रिंकलर यंत्रणा, अग्निशामक सिलिंडर्स यांसारख्या मूलभूत सुविधा कागदोपत्री असतात; प्रत्यक्षात मात्र त्यांचा अभाव दिसून येतो. अधिक नफ्याच्या हव्यासापोटी प्रत्येक इंचाचा व्यावसायिक वापर केला जातो आणि सुरक्षेला दुय्यम स्थान दिले जाते. अग्निशामक दलाचे 'ना हरकत प्रमाणपत्र' मिळवितानाही नियमांपेक्षा भ्रष्ट व्यवहारांना प्राधान्य दिले जात असल्याची बाब लपून राहिलेली नाही.

राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाच्या आकडेवारीनुसार देशात दरवर्षी सुमारे १.६ लाख आगीच्या घटना घडतात आणि २७ हजारांहून अधिक नागरिकांचा मृत्यू होतो. शॉर्ट सर्किट, निकृष्ट दर्जाचे विद्युत साहित्य, क्षमतेपेक्षा अधिक वीजवापर आणि सुरक्षा यंत्रणांचा अभाव ही त्यामागील प्रमुख कारणे आहेत. या घटनांमुळे केवळ मानवी जीवितहानीच नव्हे, तर कोट्यवधी रुपयांचे आर्थिक नुकसानही होते.

या पार्श्वभूमीवर केवळ नियम तयार करून उपयोग नाही, तर त्यांची कठोर अंमलबजावणी आवश्यक आहे. अग्निसुरक्षा प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे, सर्व व्यावसायिक इमारती, रुग्णालये, शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेसचे नियमित फायर ऑडिट करणे, तसेच त्याचे अहवाल सार्वजनिक करणे गरजेचे आहे. प्रत्येक संस्थेत नियमित मॉक ड्रिल घेऊन नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्याचे प्रशिक्षण देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

लखनौतील दुर्घटनेतील मृत्यू हे केवळ आकडे नाहीत; ते भ्रष्टाचार, निष्काळजीपणा आणि प्रशासनाच्या उदासीनतेचे बळी आहेत. मानवी जीवाचे मूल्य कोणत्याही बिल्डरच्या नफ्यापेक्षा किंवा अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कमाईपेक्षा मोठे आहे. ही जाणीव प्रशासन, विकासक आणि समाजाने ठेवली, तरच अशा दुर्घटनांची पुनरावृत्ती थांबेल. अन्यथा विकासाच्या नावाखाली उभ्या राहणाऱ्या उंच इमारती सुरक्षिततेचे प्रतीक न ठरता, नागरिकांसाठी जिवंत समाधीच ठरत राहतील.

## प्रासंगिक »

### अतिरेक नको

**एका तळ्याकाठी राजहंस आणि बगळा राहत होते. एके दिवशी राजहंस बगळ्याला म्हणाला, "तू खूप खादाड आहेस. पाण्यातील कोणताही प्राणी विचार न करता खातोस.**

मी मात्र फक्त उमललेल्या कमळातील तंतूच खातो." त्यावर बगळा म्हणाला, "असा चोखंदळपणा चांगला नाही. जे मिळेल ते खाऊन समाधानी राहावे. बगळा अन्नाच्या शोधात दुसऱ्या तळ्याकाठी गेला. तेथे त्याला एक मासा दिसला. विचार न करता त्याने तो गिळला; पण त्या माशामध्ये मासेमाऱ्याचा गळ असल्याने तो घशात अडकला आणि बगळ्याचा मृत्यू झाला.

दुसरीकडे, राजहंस आपल्या आवडीच्या कमळांच्या शोधात दुसऱ्या तळ्यावर गेला. मात्र, तेथे शिकाऱ्याने हंस पकडण्यासाठी जाळे लावले होते.

कमळाच्या मोहापायी तोही त्या जाळ्यात अडकला. अशा प्रकारे बगळ्याचा अति खादाडपणा आणि राजहंसाचा अति चोखंदळपणा दोघांनाही महागात पडला.

- तात्पर्य : **कोणत्याही गोष्टीचा अतिरेक कधीही हिताचा नसतो.**

लोकसभा निवडणुकीत अपेक्षेपेक्षा कमी जागा मिळाल्यानंतरही भारतीय जनता पक्षाने संसदेतील संख्याबळ वाढविण्याचे प्रयत्न अधिक तीव्र केले आहेत. लोकसभा आणि राज्यसभेत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला बहुमत असतानाही ही धडपड सुरू आहे

# राजकारणात संख्याबळाचे महत्त्व

यामागे केवळ सत्तेची लालसा नसून, स्थिर सरकार आणि दीर्घकालीन राजकीय सुरक्षिततेचा विचार असल्याचे दिसून येते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीय राजकारणातील अस्थिर आघाडी सरकारांचा इतिहास जवळून अनुभवला आहे. अटल बिहारी वाजपेयी यांचे सरकार एका मताने कोसळल्याची घटना आणि पी. व्ही. नरसिंहराव यांच्या सरकारला वारंवार राजकीय संकटांचा सामना करावा लागल्याचा काळ यामुळे स्थिर बहुमताचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले. त्यामुळे मित्रपक्षांवर पूर्णपणे अवलंबून राहण्यापेक्षा स्वतःचा पक्ष अधिक मजबूत करण्यावर भाजपचा भर आहे. 'चारशे पार' ही घोषणा केवळ निवडणूक प्रचारापुरती नव्हती, तर स्थिर शासनव्यवस्थेचा दीर्घकालीन राजकीय दृष्टिकोन त्यामागे होता.



दुसरीकडे, आंतरराष्ट्रीय पातळीवर भारताचे वाढते महत्त्वही अधोरेखित होत आहे. जी-७ शिखर परिषदेत भारत कायम सदस्य नसतानाही पंतप्रधान मोदींना अग्रक्रमाचे स्थान मिळाले. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी हिंदीतून 'प्रिय मित्र नरेंद्र' असे संबोधणे ही केवळ औपचारिकता नव्हती, तर दोन्ही नेत्यांतील वैयक्तिक विश्वास आणि भारताच्या वाढत्या जागतिक प्रभावाचे प्रतीक मानले गेले. आजच्या जागतिक राजकारणात वैयक्तिक संबंधही कूटनीतीत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे यातून स्पष्ट होते.

देशांतर्गत राजकारणातही काही सकारात्मक संकेत दिसून येत आहेत. राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदींसह सत्ताधारी नेत्यांनी दिलेल्या शुभेच्छा आणि त्यानंतर झालेला सौहार्दपूर्ण संवाद हे संसदीय परंपरेतील स्वागतार्ह चित्र ठरले. मतभेद कायम असले तरी लोकशाहीत संवादाची दारे उघडी राहणे आवश्यक असते. मात्र, संसदेच्या आगामी अधिवेशनात हे वातावरण कितपत टिकेल, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

दरम्यान, पक्षांतराच्या राजकारणाची दुसरी बाजूही समोर आली. 'आप'मधून भाजपमध्ये दाखल झालेल्या राज्यसभा खासदारांचे सुरुवातीला स्वागत झाले असले, तरी पंजाबमधील निवडणूक नियोजनाच्या बैठकीत त्यांना स्थान मिळाले नाही. यावरून पक्षांतर करून आलेल्या नेत्यांना प्रत्यक्ष निर्णयप्रक्रियेत किती महत्त्व दिले जाते, हा प्रश्न उपस्थित होतो. लोकशाहीत संख्याबळ महत्त्वाचे असले तरी तेवढेच महत्त्व संवाद, विश्वास आणि सक्षम नेतृत्वालाही आहे. स्थिर सरकार, प्रभावी कूटनीती आणि निरोगी संसदीय परंपरा यांचा समतोल राखला, तरच लोकशाही अधिक सक्षम होईल.

## ॥ अभंगवाणी ॥



रुपी जडले लोचन ।
पायी स्थिरावले मन॥१॥

देहभाव हरपला ।
तुज पाहतां विठ्ठला ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# लग्नपत्रिकेवर जन्मतारीख अनिवार्य?; बालविवाहाला लगाम घालण्याची तयारी

## राजस्थानच्या धर्तीवर राज्य सरकारचा प्रस्ताव




महाईन्यूज । मुंबई

**ज्यातील बालविवाहाच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी राज्य सरकार महत्त्वाचे पाऊल उचलण्याच्या तयारीत आहे. लग्नपत्रिकेवर वधू-वराच्या नावासोबत त्यांच्या जन्मतारखेचा उल्लेख बंधनकारक करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून, लवकरच याबाबत अंतिम निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.**

### बालविवाह रोखण्यासाठी सरकारचे महत्त्वाचे पाऊल

राज्यातील बालविवाहाच्या वाढत्या घटनांना आळा घालण्यासाठी लग्नपत्रिकेवर वर-वधूची जन्मतारीख छापणे बंधनकारक करण्याचा प्रस्ताव राज्य सरकारच्या विचाराधीन आहे. हा नियम लागू झाल्यास विवाहापूर्वी वधू-वराचे वय सहज पडताळता येणार असून बालविवाह रोखण्यास मदत होईल. विधानसभेत सादर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार परभणी (४८%), बीड (४३.७%), धुळे (४०.५%) आणि सोलापूर (४०.३%) या जिल्ह्यांमध्ये बालविवाहाचे प्रमाण चिंताजनक आहे. महिला व बालविकास विभागाने कायद्याची कठोर अंमलबजावणी, जनजागृती आणि शिक्षणावर भर देण्याबरोबरच राजस्थानच्या धर्तीवर हा नियम लागू करण्याची तयारी सुरू केली आहे. शासनाचा अंतिम निर्णय झाल्यानंतर राज्यभर या नियमाची अंमलबजावणी होण्याची शक्यता आहे.





राजस्थान सरकारने अलीकडेच अशा प्रकारचा नियम लागू केला असून, त्याच धर्तीवर महाराष्ट्रातही हा निर्णय घेण्याचा विचार सुरू आहे. हा नियम लागू झाल्यास विवाहापूर्वी वधू-वराचे वय सहज पडताळता येणार असून, बालविवाह रोखण्यास मोठी मदत होईल, असा सरकारचा विश्वास आहे.

विधानसभेत सादर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये बालविवाहाचे प्रमाण अजूनही चिंताजनक आहे. परभणीमध्ये ४८ टक्के, बीडमध्ये ४३.७ टक्के, धुळ्यात ४०.५ टक्के आणि सोलापूरमध्ये ४०.३ टक्के बालविवाह नोंदविण्यात आले आहेत. अनेक ठिकाणी १८ वर्षांखालील मुलींचे विवाह होत असल्याचेही समोर आले आहे.

महिला व बालविकास विभागाने विधानसभेत दिलेल्या लेखी माहितीनुसार, बालविवाहामुळे मुलींच्या शिक्षण, आरोग्य आणि सर्वांगीण विकासावर गंभीर परिणाम होत आहेत. त्यामुळे कायद्याची कठोर अंमलबजावणी, जनजागृती आणि शिक्षणावर भर देण्यासोबतच लग्नपत्रिकेवर जन्मतारीख छापणे बंधनकारक करण्याचा प्रस्ताव पुढे आला आहे.

सरकारचा अंतिम निर्णय झाल्यानंतर हा नियम राज्यभर लागू होण्याची शक्यता असून, त्यामुळे बालविवाह रोखण्यासाठी सामाजिक जबाबदारीही अधिक प्रभावीपणे पार पाडली जाईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांची बनावट स्वाक्षरी; ४ कोटींच्या घोटाळ्याचा कट उघड




### संशयास्पद कागदपत्रांमुळे उघडकीस आला प्रकार

जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत विविध विकासकामांच्या प्रस्तावांना जिल्हा व्यवस्थापन समितीच्या बैठकीत मंजुरी दिल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने संबंधित कामांना प्रशासकीय मान्यता दिली जाते. मात्र, अलीकडच्या काळात काही संशयास्पद आदेश आणि निधी वितरणासंदर्भातील कागदपत्रे फिरत असल्याची माहिती प्रशासनाच्या निदर्शनास आली होती. त्यानंतर करण्यात आलेल्या पडताळणीत हा गंभीर प्रकार समोर आला.

### व्हॉट्सॲपवरील पीडीएफने उघडकीस आणला घोटाळा

२२ जून रोजी जिल्हा खनिकर्म विभागातील एका संगणक ऑपरेटरच्या व्हॉट्सॲपवर प्रशासकीय मान्यता आदेशांच्या दोन पीडीएफ प्रती पाठविण्यात आल्या. संबंधित आदेश खरे आहेत का, याची पडताळणी करताना त्यांवरील जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या बनावट असल्याचे निष्पन्न झाले. शासकीय नमुन्यासारखी हुबेहूब बनावट कागदपत्रे तयार करून चार कोटी रुपयांच्या विकासकामांसाठी खोटे प्रशासकीय मान्यता आदेश तयार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार यामुळे उघडकीस आला.

महाईन्यूज । गडचिरोली

**जिल्हा खनिज प्रतिष्ठान (डीएमएफ) अंतर्गत मंजूर होणाऱ्या विकासकामांच्या निधीवर डल्ला मारण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या बनावट स्वाक्षऱ्या आणि खोट्या शासकीय पत्रांचा वापर करून तब्बल चार कोटी रुपयांच्या विकासकामांचे बनावट प्रशासकीय मान्यता आदेश तयार करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार गडचिरोलीत उघडकीस आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागासाठी दोन कोटी आणि जिल्हा परिषदेसाठी दोन कोटी रुपयांच्या कामांशी संबंधित ही बनावट कागदपत्रे तयार करण्यात आल्याने प्रशासनात खळबळ उडाली आहे.**

जिल्हा खनिज प्रतिष्ठान अंतर्गत विकासकामांना मंजुरीनंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने प्रशासकीय मान्यता दिली जाते. मात्र, अलीकडे काही संशयास्पद आदेश आणि निधी वितरणासंदर्भातील कागदपत्रे फिरत असल्याची माहिती प्रशासनाला मिळाली. त्यानंतर करण्यात आलेल्या पडताळणीत बनावटगिरीचा प्रकार उघड झाला.

२२ जून रोजी जिल्हा खनिकर्म विभागातील एका संगणक ऑपरेटरच्या व्हॉट्सॲपवर प्रशासकीय मान्यता आदेश क्रमांक २८६/२०२६ आणि २८७/२०२६ यांच्या पीडीएफ प्रती पाठविण्यात आल्या. संबंधित कामांना मंजुरी मिळाली आहे का, अशी विचारणा करण्यात आली होती. पडताळणीदरम्यान या आदेशांवरील जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या बनावट असल्याचे स्पष्ट झाले. विशेष म्हणजे, ही कागदपत्रे शासकीय नमुन्याप्रमाणे इतक्या हुबेहूब पद्धतीने तयार करण्यात आली होती की प्रथमदर्शनी ती खरी असल्याचा भास होत होता.

दरम्यान, काही ठेकेदारांकडे हे कथित मान्यता आदेश पाठवून आर्थिक व्यवहारासाठी दबाव टाकण्यात आल्याची आणि पैशांची मागणी झाल्याची चर्चा सुरू आहे. या दाव्यांची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नसली तरी तपास यंत्रणांनी या दिशेनेही चौकशी सुरू केली आहे. त्यामुळे या बनावटगिरीमागे संघटित रॅकेट कार्यरत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी पोलीस अधीक्षकांना कारवाईचे निर्देश दिले. त्यानुसार सहाय्यक जिल्हा खनिकर्म अधिकारी राहुल विश्वनाथ राठोड यांनी गडचिरोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.


पोलिसांनी भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील विविध कलमांन्वये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला असून, या बनावटगिरीमागील सूत्रधार आणि संभाव्य आर्थिक व्यवहारांचा शोध घेतला जात आहे.

# अमेरिका-इराण करार धोक्यात?

## अमेरिका आणि इराण यांच्यातील ऐतिहासिक कराराला इस्रायल-लेबनॉन संघर्षाचे गालबोट

**महाईन्यूज । इस्रायल**

**अमेरिका व इराण यांच्यात १४ कलमी सामंजस्य करार १७ जून रोजी झाला आहे. या कराराला गालबोट लावण्याचे काम इस्रायलकडून केले जात आहे. लेबनॉन या देशासह इतर सर्व ठिकाणी सुरू असलेला संघर्ष तात्काळ थांबवला जाईल, अशी अमेरिका व इराण करारातील पहिलीच अट आहे. इस्रायलकडून लेबनॉनवर हल्ले सुरूच आहेत. इतकेच नव्हे, तर इस्रायलने लेबनॉनचा काही भाग ताब्यात घेतला आहे. इस्रायल व लेबनॉन हे शेजारी देश असून इस्रायलच्या उत्तरेला लेबनॉन आहे.**



इस्रायल समोर सध्या लेबनॉनमधील हेजबोल्लाचे आव्हान आहे. १९८२ मध्ये इस्रायलने दक्षिण लेबनॉनवर आक्रमण केले होते. दक्षिण लेबनॉनला लागूनच इस्रायलची सीमा आहे. त्यावेळी दक्षिण लेबनॉनमध्ये इराणचे समर्थन असलेल्या हेजबोल्ला या संघटनेचा जन्म झाला. कोणत्याही देशाचा भाग नसलेली हेजबोल्ला ही बंडखोरांची संघटना दक्षिण लेबनॉनमध्ये प्रभाव निर्माण करत होती. २००० मध्ये इस्रायलच्या सैन्याने दक्षिण लेबनॉनमधून माघार घेतली. त्यानंतर हेजबोल्लाने आपले नेटवर्क आणखी मजबूत केले. २००६ मध्ये हेजबोल्ला व इस्रायल यांच्यात एक महिना संघर्ष चालला. हेजबोल्ला इस्रायलविरोधात छुप्पे युद्ध करते. त्यामुळे इस्रायलची अडचण होते.

हेजबोल्लाचा उदय झाल्याने इस्रायलच्या उत्तरेकडील सीमेवर कायमच अशांतता असते. ऑक्टोबर २०२३ मध्ये इस्रायल- हमास युद्ध झाले. त्यावेळी हेजबोल्लाने इस्रायलवर हल्ले केले होते. इस्रायल व लेबनॉन यांच्यात अनेकदा शस्त्रसंधी झाल्या, परंतु, दोन्ही देशांमधील संघर्ष काही थांबला नाही. १९ जून रोजी अमेरिकेच्या मध्यस्थीने दोन्ही देशांमध्ये ताजा शस्त्रसंधी करार झाला. परंतु, संघर्ष सुरूच आहे. लेबनॉनलगत असलेली उत्तरेकडील सीमा सुरक्षित करणे हे इस्रायलसमोरील आव्हान आहे. सध्या हेजबोल्लाचे २० ते ५० हजार सशस्त्र बंडखोर असल्याचा अंदाज आहे. तर छुपे बंडखोर सामील झाल्यास ही संख्या १ लाखापर्यंत वाढू शकते. हेजबोल्लाकडे रॉकेट, मिसाइल आणि ड्रोनचा मोठा साठा आहे. सीमेलगत असलेल्या इस्रायलच्या नागरी वस्त्यांवर हल्ले करण्यासाठी त्यांनी भूमिगत बोगदे तयार केले आहेत. त्यामुळे इस्रायलच्या उत्तरेकडील भागाला मोठा धोका आहे.

### लेबनॉनमुळे इस्रायल असुरक्षित

लेबनॉनमुळे सध्या इस्रायलच्या सुरक्षेला थेट धोका आहे. या धोक्याचे कारण लेबनॉन सरकार नसून लेबनॉनमधील एक बंडखोर, सशस्त्र संघटना हेजबोल्ला आहे. लेबनॉन सरकारचे हेजबोल्लावर कोणतेही नियंत्रण नाही. त्यामुळे लेबनॉन सरकार कमकुवत झाले असून तिथे हेजबोल्लाचा प्रभाव सध्या वाढला आहे. हेजबोल्लाचा प्रभाव वाढल्याने इस्रायलचा धोका वाढला आहे. इस्रायल असुरक्षित झाला आहे. जोपर्यंत गरज आहे तोपर्यंत इस्रायली सैन्य दक्षिण लेबनॉनमध्ये कायम राहील, इराणला अण्वस्त्र कोणत्याही परिस्थिती मिळू देणार नाही, असे इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी नुकतेच म्हटले आहे. दरम्यान, हेजबोल्लाचा प्रमुख नईम कासीम याने इस्रायली सैन्य दक्षिण लेबनॉनमध्ये असल्याचे वृत्त फेटाळले आहे, असे कासीमने म्हटले.

### इस्रायलचे धोरण काय?

हेजबोल्लामुळे दक्षिण लेबनॉनचे रूपांतर एका भयंकर युद्धभूमीत झाले आहे. त्यामुळे हेजबोल्लाचा बंदोबस्त न करता इस्रायलच्या उत्तरेकडील सीमेवरील सैन्य कमी करणे इस्रायलसाठी धोकादायक ठरू शकते. हेजबोल्लाला इराणचे समर्थन आहे. इराणच्या 'एक्सिस ऑफ रेझिस्टन्स'चा हेजबोल्ला भाग आहे. 'एक्सिस ऑफ रेझिस्टन्स' म्हणजे इराणने तयार केलेल्या काही सशस्त्र संघटनांचे जाळे आहे. यात हेजबोल्ला, हुथी, हमास व इतर काही संघटनांचा समावेश आहे. या संघटनांचे जाळे इराक, सीरिया, येमेनपर्यंत पसरले आहे. हेजबोल्ला पासून असलेला धोका टाळण्यासाठी सीमेवर बफर झोन तयार करण्यात आले आहेत. तसेच लेबनॉनमधील लिटानी नदीपर्यंतचा भूभाग ताब्यात घेण्याचे इस्रायलने ठरवले आहे.

# जोसेफ विजय यांना स्टॅलिन यांचं जोरदार प्रत्युत्तर; व्हायरल व्हिडीओवरही भाष्य

**महाईन्यूज । तामिळनाडू**

**तामिळनाडूचे मुख्यमंत्री जोसेफ विजय यांनी एम. के स्टॅलिन यांची नक्कल केल्याचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. तामिळनाडूच्या विधानसभेत मंगळवारी हाय व्होल्टेज ड्रामा पाहण्यास मिळाला. राज्यपालांनी जो अभिनंदन प्रस्ताव मांडला त्यानंतर विजय बोलायला उभे राहिले. मात्र विजय यांच्या विरोधात डीएमकेच्या आमदारांनी घोषणाबाजी सुरु केली. यानंतर विधानसभा अध्यक्षांनी विरोधी पक्षाच्या आमदारांना शांत राहण्याची विनंती केली.**



पण त्यांची घोषणाबाजी सुरुच होती. या सगळ्याला उत्तर म्हणून विजय यांनी विधानसभा अध्यक्षांची संमती घेऊन स्टॅलिन यांची नक्कल केली. त्यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला. जोसेफ विजय आणि स्टॅलिन या दोघांचीही चर्चा दिवसभर सोशल मीडियावर रंगली होती. आता एम. के. स्टॅलिन यांनी विजय यांना जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे आणि तमिळनाडूची विधानसभा म्हणजे लाइव्ह कॅमेरा नव्हे असं म्हटलंय. तसंच विधानसभा अध्यक्षांनी जी संमती दिली त्यावरही स्टॅलिन यांनी आक्षेप नोंदवला आहे.

राजकारणाच्या ठिकाणी राजकारण आणि अभिनयाच्या ठिकाणी अभिनय ठेवावा असा सल्ला स्टॅलिन यांनी मुख्यमंत्री जोसेफ विजय यांना दिला आहे. आता विजय यांच्यावरील राजकीय जबाबदारी वाढली असून त्यांनी मुख्यमंत्रिपदाची कामगिरी गांभीर्याने स्वीकाराली पाहिजे, चेंगलपट्टूच्या न्यायालयात, एक बाई स्वतःच्या नवऱ्याला शोधत आहे ही गोष्ट आता तमिळनाडूत सर्वांना माहीत झालेली आहे. त्यामुळे अभिनेता विजयने आता मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेत शिरायला हवे." असा खोचक टोलाही स्टॅलिन यांनी विजय यांना लगावला.

### व्हायरल व्हिडीओबाबत स्पष्टीकरण

तमिळनाडूचे मुख्यमंत्री जोसेफ विजय यांनी सभापती जेसीडी प्रभाकर यांच्या परवानगीने स्टॅलिन यांची नक्कल केली. सोशल मीडियावर हा व्हिडीओ चांगलाच व्हायरलही झाला आणि विरोधकांना तो झोंबलाही. या व्हिडीओबाबत स्पष्टीकरण देताना विजय म्हणाले की, "ज्या मंडळींसाठी मी करणार होतो ते तर सभात्याग करून कधीच निघून गेले. त्यामुळे आता जरी मला करण्याची परवानगी मिळाली तरी मी करेन." विजय यांना सभापतींकडून परवानगी मिळाली आणि हसत हसत त्यांनी नक्कल केली. त्यांच्या या कृतीमुळे त्यांच्या समर्थकांमध्येही हशा पिकला.

# लंडनमध्ये साराची धमाल

बॉलिवूड अभिनेत्री सारा अली खानला चित्रपटांच्या व्यग्र वेळापत्रकातून वेळ मिळाला की ती आपल्या कुटुंबासोबत दर्जेदार वेळ घालवताना दिसते. यावेळी तिने आई अमृता सिंह आणि आजी शर्मिला टागोर यांच्यासोबत लंडनमध्ये सुट्टीचा आनंद घेतला. या खास सहलीतील काही सुंदर आणि आतापर्यंत न पाहिलेले फोटो तिने सोशल मीडियावर चाहत्यांसोबत शेअर केले आहेत. साराने तिच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर या ट्रिपमधील अनेक आठवणींना उजाळा देणारी छायाचित्रे पोस्ट केली. या फोटोंमध्ये तिचा आनंदी आणि निवांत अंदाज पाहायला मिळत आहे. तिच्या या पोस्टला चाहत्यांकडून मोठ्या प्रमाणात पसंती मिळत आहे. लंडनमध्ये सारा, तिची आई अमृता सिंह आणि आजी शर्मिला टागोर यांनी एकत्र वेळ घालवला. तिघींनी मिळून थिएटर प्लेचा आनंद घेतला. कुटुंबासोबतचे हे खास क्षण सारासाठी खूप महत्त्वाचे असल्याचे फोटोंमधून स्पष्टपणे दिसून येते. एका छायाचित्रात सारा आणि शर्मिला टागोर एका रेस्टॉरंटमध्ये दिसत आहेत. दोघींनी तिथे एकत्र जेवणाचा आनंद घेतला. आजी-नातीमधील सुंदर नाते या फोटोंमधून प्रकर्षाने जाणवते. याशिवाय, सारा आई अमृता सिंहसोबत लंडनमधील विविध पर्यटनस्थळांवर फोटो काढताना दिसत आहे. दोघींच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि सहजपणा चाहत्यांना खूप आवडला आहे. या फोटोंमधून सारा आपल्या कुटुंबाशी किती जवळची आहे, हे पुन्हा एकदा दिसून आले. फोटो शेअर करताना साराने कॅप्शनमध्ये, "लंडनमधील काही अविस्मरणीय क्षण," असे लिहिले आहे. छोट्या पण अर्थपूर्ण शब्दांत तिने या सहलीच्या आठवणी व्यक्त केल्या. सारा अली खान सोशल मीडियावर नेहमीच सक्रिय असते. ती तिच्या कामासोबतच वैयक्तिक आयुष्यातील सुंदर क्षणही चाहत्यांसोबत शेअर करत असते. तिच्या साधेपणामुळे आणि कुटुंबाशी असलेल्या जिव्हाळ्यामुळे तिचा मोठा चाहता वर्ग तयार झाला आहे. शर्मिला टागोर या भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ आणि आदरणीय अभिनेत्री आहेत. तर अमृता सिंह यांनीही अनेक लोकप्रिय चित्रपटांमध्ये काम केले आहे. त्यामुळे चित्रपटसृष्टीतील तीन पिढ्या एकत्र पाहण्याची संधी चाहत्यांना या फोटोंमुळे मिळाली.






## बॉक्स ऑफिसवर मराठीचा बोलबाला!

सध्या बॉक्स ऑफिसवर मराठी चित्रपटांचा बोलबाला सुरू आहे. 'राजा शिवाजी' आणि 'देऊळ बंद 2' या चित्रपटांच्या घवघवीत यशानंतर आता 'घबाडकुंड' या नव्या मराठी चित्रपटाने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. प्रदर्शनापूर्वीच चर्चेत असलेल्या या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे. 'घबाडकुंड'मध्ये संदीप पाठक, देवदत्त नागे, शशांक शेंडे आणि प्राजक्ता हनमघर यांसारखी दमदार स्टारकास्ट झळकली आहे. या चित्रपटातील एका अनोख्या आणि कल्पनेपलीकडच्या 'युनिव्हर्स'ची मोठ्या पडद्यावर मांडणी करण्यात आली आहे. हा एक हॉरर चित्रपट असून, याचे दिग्दर्शन प्रितम एस. के. पाटील यांनी केले आहे. याआगोदर त्यांनी अल्याड पल्याड चित्रपटाचे दिग्दर्शन केले होते. मीडिया रिपोर्टनुसार, या चित्रपटाने चौथ्या दिवशी ४९ लाख रुपयांची कमाई केली आहे. ओपनिंग दिवशी चित्रपटाने ४२ लाखांची कमाई केली होती.



# समंथाच्या घरी लवकरच येणार चिमुकला पाहुणा!

दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री समंथा रुथ प्रभू हिच्याबाबत गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या चर्चांना अखेर पूर्णविराम मिळाला आहे. अभिनेत्री लवकरच आई होणार असल्याची माहिती समोर आली असून तिच्या चाहत्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक दिवसांपासून सोशल मीडियावर तिच्या प्रेग्नन्सीबाबत विविध चर्चा सुरू होत्या. आता या वृत्ताला तिच्या नव्या चित्रपटाच्या दिग्दर्शिकेने दुजोरा दिल्याचे सांगितले जात आहे. डिसेंबर २०२५ मध्ये प्रसिद्ध दिग्दर्शक राज निदिमोरू यांच्याशी विवाहबंधनात अडकल्यानंतर समंथा आणि राज त्यांच्या आयुष्यातील नव्या टप्प्याची तयारी करत आहेत. हे दोघे त्यांच्या पहिल्या बाळाचे स्वागत करण्यासाठी उत्सुक असल्याचे वृत्त समोर आले आहे. अलीकडेच समंथाच्या 'मा इंटी बंगारम' या चित्रपटाच्या यशस्वी प्रदर्शनानिमित्त आयोजित कार्यक्रमातील काही व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले. या कार्यक्रमात सामंथा आणि तिचे पती राज निदिमोरू एकत्र दिसले. यावेळी चाहत्यांचे लक्ष सामंथाच्या बदललेल्या लूककडे गेले. काही व्हिडिओंमध्ये तिचा बेबी बंप दिसत असल्याचा दावा करण्यात आला आणि त्यानंतर या चर्चांना आणखी वेग आला. या संपूर्ण प्रकरणावर 'मा इंटी बंगारम' या चित्रपटाच्या दिग्दर्शिका बी. व्ही. नंदिनी रेड्डी यांनी एका मुलाखतीत भाष्य केले. त्यांनी सामंथाच्या आयुष्यातील हा अत्यंत आनंदाचा क्षण असल्याचे सांगितले. त्याचबरोबर अभिनेत्रीच्या आयुष्यात एकाच वेळी दोन मोठ्या आनंदाच्या घटना घडत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

# आयसीसी क्रमवारीत मोठी उलथापालथ

## कसोटीत जो रूट पुन्हा ‘किंग’, तर ODI मध्ये शुभमन गिलची गरुडझेप

**महाईन्यूज । दुबई**

**आयसीसीच्या ताज्या क्रमवारीत यावेळी मोठी उलथापालथ पाहायला मिळत आहे. विशेषतः गेल्या आठवड्यात कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेटमधील उत्कंठावर्धक सामन्यांनंतर या क्रमवारीत लक्षणीय बदल झाले आहेत. एकीकडे इंग्लंडचा स्टार फलंदाज जो रूट पुन्हा एकदा कसोटी क्रमवारीत अव्वल स्थानी विराजमान झाला आहे, तर दुसरीकडे भारतीय संघाचा कर्णधार शुभमन गिलने एकदिवसीय क्रमवारीत मोठी गरुडझेप घेत अव्वल स्थानाच्या दिशेने भक्कम पाऊल टाकले आहे.**



ऑस्ट्रेलियाच्या ट्रॅव्हिस हेडला देखील एका स्थानाचे नुकसान सोसावे लागले असून, तो दुसऱ्या क्रमांकावरून तिसऱ्या स्थानावर फेकला गेला आहे; त्याच्या खात्यात ८५३ रेटिंग गुण आहेत. न्यूझीलंडच्या रचिन रवींद्रने मात्र दोन स्थानांची प्रगती करत ७१५ रेटिंग गुणांसह पहिल्या दहा फलंदाजांमध्ये (१० व्या स्थानी) स्थान मिळवले आहे. दुसरीकडे, एकदिवसीय मालिकेतून विश्रांती घेतल्यामुळे भारताचा दिग्गज फलंदाज विराट कोहली दुसऱ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर घसरला आहे.

भारतीय कर्णधार रोहित शर्मा ७५४ रेटिंग गुणांसह चौथ्या स्थानावर स्थिर आहे. अफगाणिस्तानच्या इब्राहिम झद्रानला दोन स्थानांचे नुकसान झाले असून तो पाचव्या क्रमांकावर घसरला आहे. श्रीलंकेचा चरिथ असलंका एका स्थानाच्या फायद्यासह नवव्या, तर इंग्लंडचा हॅरी ब्रूक एका स्थानाच्या प्रगतीसह दहाव्या क्रमांकावर पोहोचला आहे.

### ब्रूकला मागे टाकत रूट पुन्हा अव्वल स्थानी

आयसीसीच्या ताज्या कसोटी क्रमवारीचा विचार केला, तर इंग्लंडच्या जो रूटने पुन्हा एकदा अव्वल स्थानावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. ताज्या क्रमवारीत दोन स्थानांची झेप घेत त्याने ८७१ रेटिंग गुणांसह पहिले स्थान पटकावले आहे. तर दुसरीकडे, गेल्याच आठवड्यात पहिल्या क्रमांकावर पोहोचलेल्या इंग्लंडच्याच हॅरी ब्रूकला एका स्थानाचा फटका बसला असून तो ८६६ रेटिंग गुणांसह दुसऱ्या स्थानावर घसरला आहे.

### गिलची मोठी गरुडझेप

एकदिवसीय (वनडे) क्रिकेट क्रमवारीचा विचार केल्यास, न्यूझीलंडचा डॅरिल मिचेल ८१५ रेटिंग गुणांसह अव्वल स्थानी कायम आहे. मात्र, या क्रमवारीत भारताच्या शुभमन गिलने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. शुभमनने थेट तीन स्थानांची मोठी झेप घेत दुसरे स्थान काबीज केले आहे. त्याची रेटिंग आता ७९१ झाली असून तो अव्वल स्थानाच्या अत्यंत जवळ पोहोचला आहे. आगामी काळात विविध देशांमध्ये सातत्याने सामने होणार असल्याने या क्रमवारीत आणखी बदल पाहायला मिळतील. विशेषतः आगामी टी-२० सामन्यांमुळे टी-२० क्रमवारीत मोठी उलथापालथ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## घानाने केली इंग्लंडच्या कर्णधारावर काळी जादू? हॅरीने गोलची सोपी संधी दवडली

**महाईन्यूज । डॅलस**

**फिफा वर्ल्ड कप २०२६ (FIFA World Cup 2026) मध्ये क्रोएशियाला ४-२ ने धूळ चारणाऱ्या इंग्लंड फुटबॉल संघाची जादू घानाविरुद्ध फिकी पडल्याचे पाहायला मिळाले. तुलनेने कमकुवत असलेल्या घानाच्या संघाने इंग्लंडला गोलरहित बरोबरीत रोखले. मात्र, या सामन्यानंतर घानाचा एक तांत्रिक नाना क्वाकू बोनसम (Nana Kwaku Bonsam) याने केलेला दावा सध्या क्रीडा जगतात प्रचंड चर्चेत आला आहे. इंग्लंडचा कर्णधार हॅरी केनवर (Harry Kane) आपली काळी जादू चालल्याचा दावा या तांत्रिकाने केला आहे.**



सामन्याच्या दुसऱ्या हाफमध्ये हॅरी केनला गोल करण्याची एक अतिशय सोपी संधी मिळाली होती. इंग्लंडला आघाडी मिळवून देण्याची सुवर्णसंधी असताना केनने मारलेला शॉट थेट नेटच्या वरून गेला. केनसारख्या दिग्गज खेळाडूने हा सोपा गोल मिस केल्याने सर्वच थक्क झाले.

सामन्याच्या शेवटच्या क्षणांमध्ये केनकडून चूक झाल्यानंतर स्टेडियममधील एका इंग्लिश चाहत्याने घानाच्या समर्थकाला गमतीने विचारले, "अरे, तुमची जादू काम करतेय वाटतं!" त्यावर घानाच्या समर्थकाने उत्तर दिले, "मित्रा, यात कोणतीही जादू नाही, केनला फक्त चांगल्या शूटिंग सरावाची गरज आहे."

विशेष म्हणजे, २०१४ च्या वर्ल्ड कपदरम्यान पोर्तुगालचा सुपरस्टार ख्रिस्तियानो रोनाल्डोच्या (Cristiano Ronaldo) गुडघ्याला झालेल्या दुखापतीमागेही आपलाच हात असल्याचा दावा याच तांत्रिकाने केला होता. या सामन्यात इंग्लंडचा दबदबा पाहायला मिळाला. इंग्लंडने गोल करण्यासाठी तब्बल १९ शॉट्स मारले, तर घानाला केवळ १ शॉट मारता आला. मात्र, गोलच्या सोप्या संधीचे रूपांतर गुणांमध्ये न करता आल्यामुळे इंग्लंडला या बरोबरीवर समाधान मानावे लागले. वर्ल्ड कपच्या इतिहासात इंग्लंडचा संघ आफ्रिकेतील कोणत्याही देशाकडून कधीही हरलेला नाही, हा रेकॉर्ड यंदाही कायम राहिला.

### मी हॅरी केनवर काम करतोय

घानाचा तांत्रिक बोनसम याने 'डेली स्टार'शी बोलताना केनवर काळी जादू केल्याचा उघड दावा केला. बोनसम सामन्यापूर्वीच म्हणाला होता, "मी हॅरी केनवर काम करत आहे. मी काय करू शकतो हे याआधीही दाखवून दिले आहे. त्याला रोखण्यासाठी मला काय करावे लागेल हे मला माहित आहे. मला त्याला कोणतीही गंभीर दुखापत करायची नाही, पण माझ्या देशाविरुद्ध तो चांगली कामगिरी करू शकणार नाही.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। गुरुवार ।
दि. 25 जून 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# ताथवड्यात आईसह दोन चिमुकल्यांचा संशयास्पद मृत्यू

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

ताथवडे येथे आर्थिक विवंचनेत सापडलेल्या एका महिलेने आपल्या दोन मुलांसह विष प्राशन करून जीवन संपवल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सोमवारी उघडकीस आलेल्या या हृदयद्रावक घटनेत तिघांचाही मृत्यू झाला असून, शवविच्छेदन आणि रासायनिक विश्लेषण अहवालानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. मृतांमध्ये कल्पना बिपीन सूर्यवंशी (३५), सुभश्री बिपीन सूर्यवंशी (१७) आणि दादू बिपीन सूर्यवंशी (१०) यांचा समावेश आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कल्पना सूर्यवंशी या ताथवडे येथील जी. जी. इंटरनॅशनल स्कूलच्या मागे भाड्याच्या घरात दोन मुलांसह राहत होत्या. त्याच इमारतीच्या खालच्या मजल्यावर त्यांच्या बहिणीचे कुटुंब वास्तव्यास आहे. सोमवारी दिवसभर तिघेही बाहेर न आल्याने बहिणीला संशय आला. दरवाजा ठोठावूनही प्रतिसाद न मिळाल्याने खिडकीतून पाहिले असता तिघेही घरात बेशुद्ध अवस्थेत दिसले. नागरिकांच्या मदतीने दरवाजा तोडून घरात प्रवेश करण्यात आला आणि तिघांना

> ताथवडे येथे आई आणि दोन मुलांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. प्राथमिक तपासात आत्महत्येचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. शवविच्छेदन व रासायनिक विश्लेषण अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल.
>
> **- अशोक कडलक, वरिष्ठ पोलिस निरीक्षक, वाकड पोलीस ठाणे**

तातडीने वायसीएम रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित केले. प्राथमिक तपासात कल्पना सूर्यवंशी यांनी सकाळी तयार केलेल्या इडली-सांबरमध्ये विषारी पदार्थ मिसळून स्वतःसह मुलांना खायला दिल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. घटनास्थळावरून अन्नाचे नमुने जप्त करण्यात आले असून ते तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत.

दरम्यान, घर खरेदीसाठी घेतलेल्या बँकेच्या कर्जाचे हप्ते भरता न आल्याने काही दिवसांपूर्वी घर लिलावाची नोटीस बजावण्यात आली होती. त्यामुळे त्या मोठ्या मानसिक तणावाखाली असल्याची माहिती नातेवाईकांनी दिली आहे.

## आर्थिक विवंचनेचा संशय

प्राथमिक माहितीनुसार, कल्पना सूर्यवंशी यांनी घर खरेदीसाठी बँकेकडून कर्ज घेतले होते. मात्र, आर्थिक अडचणींमुळे कर्जाचे हप्ते नियमित भरता आले नाहीत. काही दिवसांपूर्वी बँकेकडून घर लिलावाची नोटीस मिळाल्याने त्या मानसिक तणावाखाली असल्याचे नातेवाईकांनी सांगितले. पोलिसांच्या प्राथमिक तपासात या आर्थिक विवंचनेतून टोकाचे पाऊल उचलल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, शवविच्छेदन आणि रासायनिक विश्लेषण अहवालानंतरच मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे.




D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026

DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.
It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.

UG/PG Programs
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.




Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# पिंपरी-चिंचवडमध्ये पदपथावरील दिव्यांची चोरी

## अर्बन स्ट्रीटवरील तीन ते चार ठिकाणी प्रकार 100 हून अधिक दिवे चोरीला गेल्याच प्रकार उघड

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने शहरातील अनेक मुख्य मार्गावर अर्बन स्ट्रीट डिझाईननुसार प्रशस्त पदपथ व सायकल ट्रॅक बनवले आहेत. तसेच, सुशोभिकरण केले आहे. त्या प्रशस्त पदपथावरील आकर्षक खांबांवरील दिवे गायब झाले आहेत. चौकशी केली असता, शहरातील चार ठिकाणच्या तब्बल 100 ते 125 दिव्यांची चोरी झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.**



महापालिकेच्या वतीने प्रशस्त रस्ते अरुंद करून अर्बन स्ट्रीट डिझाईनचे काम करण्यात येत आहे. दापोडी ते निगडी, थेरगाव, डांगे चौक, निगडी-प्राधिकरण, रावेत, आकुर्डी, पिंपळे गुरव, पिंपळे सौदागर, भोसरी, सांगवी फाटा ते किवळे, आळंदी रस्ता, पिंपरी, नेहरूनगर आदी ठिकाणी अर्बन स्ट्रीट डिझाईने पदपथ व सायकल ट्रॅक करून सुशोभिकरण करण्यात आले आहे. त्यावर आकर्षक बाके, विद्युत दिव्यांचे खांब तसेच, चित्ताकर्षक रचना करण्यात आली आहे. त्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे.

या प्रशस्त पदपथ व सायकल ट्रॅकला नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. सकाळी जॉगिंग तसेच, वार्किंग तसेच, सायकलिंग करण्यासाठी नागरिक त्याचा वापर करत आहेत. तसेच, छायाचित्र व व्हिडिओ काढण्यासाठी नागरिक त्या आकर्षक पदपथाचा उपयोग करत आहेत. त्याचे अनेक छायाचित्र सोशल मीडियावर व्हायरल झाले असून, त्याला नागरिकांची मोठी पसंती मिळत आहे.

मात्र, नव्याने तयार केलेल्या दापोडी ते निगडी मार्गावरील सर्व्हिस रस्त्यावर लावलेल्या आकर्षक विद्युत दिव्यांच्या खाबांवरील दिवे गायब झाले आहेत. त्यामुळे पदपथावर प्रकाश पडत नाही. परिणामी, पदपथ व सायकल ट्रॅक नितेज झाले आहेत. या संदर्भात महापालिकेच्या विद्युत विभागाकडे चौकशी केली असता, दिवे गायब होण्याचे प्रकार तीन ते चार ठिकाणच्या पदपथावर झाले आहेत.

### महापालिकेचे सीसीटीव्ही कॅमेरे फक्त शोभेसाठी?

महापालिकेकडून शहरभरात 6 हजारांपेक्षा अधिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. त्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यातून खांबांवरील दिवे चोरणारे महापालिकेच्या हाती लागू शकतात. मात्र, महापालिकेचे अनेक सीसीटीव्ही कॅमेरे बंद व नादुरुस्त अवस्थेत आहेत. त्यामुळे कॅमेरे केवळ शोभेचे ठरत असल्याचे चित्र आहे. महापालिकेने अर्बन स्ट्रीट डिझाईनुसार पदपथ व सायकल ट्रॅक विकसित केले आहेत. त्यावर आकर्षक रचनेचे विद्युत दिव्यांचे खांब लावण्यात आले आहेत.

### महापालिका कर्मचाऱ्यांचा सहभाग?


महापालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून शहरात विद्युत दिव्यांचे काम केले जाते. ते कर्मचारी दिवे दुरुस्त करणे, बसवणे व काढण्यास तरबेज असतात. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे कर्मचारी किंवा कंत्राटी कर्मचाऱ्यांनी ते महागडे दिवे चोरल्याची चर्चा महापालिका वर्तुळात आहे. दिवे काढताना ते नेहमीचे कर्मचारी असल्याने त्यांना कोणी हटकले नसावे, असेही बोलले जात आहे.

# लोणावळ्यात योग साधकाचा अनोखा प्रयोग; गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी प्रयत्न

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**योग हा कोणत्याही जातीधर्माचा नसून ते एक आरोग्याचे शास्त्र आहे, हा संदेश देत लोणावळ्याचे प्रसिद्ध योग साधक हभप श्रीमंत रमेशसिंह व्यास राजपुरोहित यांनी योगाच्या क्षेत्रात एक नवा इतिहास रचण्याची तयारी केली आहे. तब्बल २५ वर्षांच्या अखंड तपश्चर्येनंतर, त्यांनी पाण्यावर आणि पाण्याखाली कठीण योगसाधना करून 'जल तत्त्वावर' विजय मिळवला असून, आता ते गिनीज रेकॉर्डसाठी सज्ज झाले आहेत.**





लोणावळा येथील 'तरंग तलाव' आता स्थानिक नागरिकांसाठी 'जल योग धाम' बनले आहे. येथे श्रीमंत राजपुरोहित नियमितपणे जिज्ञासू विद्यार्थ्यांना निःशुल्क जल योगाचे धडे देत आहेत. लवकरच ते योगासनात पाण्यात सर्वाधिक काळ तरंगणे आणि सर्वात खोल पाण्याखालील योग ध्यान या दोन वर्गवारींमध्ये गिनीज वर्ल्ड रेकॉर्डसाठी अधिकृत प्रयत्न करणार

राजपुरोहित यांनी येथील 'तरंग तलाव' येथे अनेक दुर्मीळ योगिक प्रयोगांचे सादरीकरण केले आहे. यामध्ये १० फूट खोल पाण्यात आधाराशिवाय केलेले 'जल शीर्षासन', पाण्याच्या पृष्ठभागावर स्थिर राहून केलेले 'जल पद्मासन' आणि 'जल शवासन', तसेच हात-पाय व मस्तकावर ५ प्रज्वलित दिवे ठेवून केलेली 'पंच दीप साधना' यांचा समावेश आहे. याव्यतिरिक्त, काही मिनिटांपर्यंत अंतर्गत कुंभक साधून केलेले 'जल गर्भासन' हे त्यांच्या प्रगत योगसाधनेचा पुरावा देणारे ठरले आहे. तज्ज्ञांच्या मते, 'जालंधर बंध', 'उड्डियान बंध' आणि 'महा कुंभक' या क्रियांच्या परमोच्च बिंदूमुळे त्यांचे शरीर पाण्यावर सहज तरंगू शकते, जे योग विज्ञानातील एक आश्चर्य मानले जात आहे.

### योग म्हणजे जीवनप्रक्रिया!

आपल्या साधनेबद्दल बोलताना श्रीमंत राजपुरोहित म्हणाले, हठ योग हा केवळ व्यायामाचा प्रकार नसून, ती एक जिवंत प्रक्रिया आहे. जेव्हा आपण शरीर, मन आणि भावनांची ऊर्जा आपल्या अंतरात्म्यात विलीन करतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने परमानंदाची अनुभूती येते. योग म्हणजे कल्पनेतून बाहेर पडून वास्तवाशी जोडले जाणे होय. त्यांनी तरुणांना दररोज किमान १० मिनिटे मोबाईलपासून दूर राहून प्राणायाम करण्याचे आणि शरीराचे मंदिर योगाद्वारे पवित्र राखण्याचे आवाहन केले आहे.

### गुरुपरंपरा आणि जागतिक ध्येय

श्रीमंत राजपुरोहित यांना योग गुरू भारत सिंह, योगगुरू अरुण येवले आणि डॉ. बी. आर. शर्मा यांचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच, ब्रह्मस्वरूप गुरुदेव देवमुनींची कृपा आणि कैवल्यधाम योग संस्थेचे ब्रह्मलीन स्वामी महेशानंदजी यांच्या आशीर्वादाने ते ही साधना पुढे नेत आहेत. भारतीय ऋषी-मुनींची परंपरा आजही जिवंत आहे आणि योग हे पंचमहाभूतांवर विजय मिळवण्याचे विज्ञान आहे, हे जगाला दाखवून देणे हे त्यांचे मुख्य ध्येय आहे. योगाच्या माध्यमातून शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक विकास साधत भारतीय संस्कृतीचा गौरव जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी ते सातत्याने कार्यरत आहेत. युवकांनी योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावे, असा संदेशही ते विविध उपक्रमांतून देत असतात. योग ही केवळ व्यायामपद्धती नसून निरोगी, संतुलित आणि सकारात्मक जीवन जगण्याची जीवनशैली आहे, असा त्यांचा ठाम विश्वास आहे.

# पवना धरण परिसरात पावसाची हजेरी

## गेल्या २४ तासांत पवना धरण परिसरात ४२ मिमी पावसाची नोंद झाली

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**मागील साडेसहा वर्षांपासून एक दिवसाआड पाणीपुरवठ्याला सामोरे जात असलेल्या आणि शुक्रवार (१९ जून) पासून वाढीव १५ टक्के पाणीकपातीचे संकट ओढावलेल्या पिंपरी-चिंचवडकरांसाठी दिलासादायक बातमी आहे. शहराची तहान भागविणाऱ्या पवना धरणात परिसरात पावसाने हजेरी लावली आहे. गेल्या चोवीस तासात ४२ मिली मीटर पावसाची नोंद झाली आहे. धरणातील पाणीसाठा १८.०२ टक्के झाला आहे.**



शहरात २५ नोव्हेंबर २०१९ पासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू आहे. अनियमित, अपुरे आणि कमी दाबाने पाणी येत असल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आहेत. असे असतानाच यंदा पावसाने ओढ दिल्याने पवना धरणातील पाणीसाठा झपाट्याने कमी होऊन १९ टक्यांवर आला होता. या पार्श्वभूमीवर पाटबंधारे विभागाने १५ टक्के आणखी पाणीकपात करण्याचे आदेश महापालिकेला दिले होते. त्यानुसार महापालिकेने शुक्रवार पासून त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यामुळे पवना धरणातून महापालिकेला ५५० ऐवजी ४७५ एमएलडीच पाणी मिळत आहे. त्यामुळे प्रशासनाने पाण्याच्या वेळामध्ये कपात केली आहे. तेव्हापासून अपुरा, कमी दाबाने, विस्कळीत पाणीपुरवठा होत असल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

ओढ दिलेल्या पावसाने धरण परिसरात हजेरी लावली आहे. गेल्या चोवीस तासात ४२ मिली मीटर पावसाची नोंद झाली आहे. धरणातील पाणीसाठा १८.०२ टक्के झाला आहे. एक जून पासून आतापर्यंत धरण परिसरात ६५ मिली मीटर पाऊस झाला आहे. दरम्यान, मागीलवर्षी आतापर्यंत ४७.६४ पाणीसाठा धरणात झाला होता.

सर्वांना मुबलक व पुरेसे पाणी मिळण्यासाठी महापालिकेने नोव्हेंबर २०१९ मध्ये काही दिवसांसाठी एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरु केला होता. काही दिवसांसाठीचा एक दिवसाआडचा पाणीपुरवठा पुढे कायम ठेवण्यात आला आहे. साडेसहा वर्षे झाले, तरी एक दिवसाआडच पाणीपुरवठा होत आहे.

### भामा आसखडचे काम संथगतीने

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या लोकसंख्येसाठी भामा आसखेड धरणातून १६७ दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी आणण्याचे महापालिकेने हाती घेतलेले काम संथगतीने सुरु आहे. डिसेंबर २०२४ मध्ये काम पूर्ण करण्याचे नियोजन असताना अशुद्ध जलउपसा केंद्र, पंपिंग स्टेशन, जलवाहिनीची कामे अद्यापही सुरू आहेत. ठेकेदार बदलण्यात आला असून त्याला नऊ महिन्यांची मुदत देण्यात आली आहे.

# वारकऱ्यांच्या वैद्यकीय सोयींसाठी जिल्हा प्रशासनाने पाठवलेला प्रस्ताव मंजूर

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**आषाढी वारीसाठी अवघे काही दिवस शिल्लक असताना पुणे जिल्हा आरोग्य विभागाच्या तयारीला वेग आला असून, यंदा प्रथमच आळंदी ते निरा या वारी मार्गावर वारकऱ्यांसाठी विशेष अतिदक्षता विभाग (आयसीयू) सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जिल्हा प्रशासनाने या संदर्भातील प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पाठवला असून, त्याला हिरवा कंदील मिळाला आहे.**



त्यामुळे वारीदरम्यान गंभीर रुग्णांना तातडीची आणि अत्याधुनिक आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे.

जिल्हा आरोग्य विभागाने पुणे जिल्ह्यातील पालखी मार्गावर वारकऱ्यांसाठी कायमस्वरुपी अतिदक्षता विभाग सुरू करण्यासाठी एक आराखडा तयार केला असून, त्यात अतिदक्षता विभागांची माहिती, ठिकाणे, आवश्यक कुशल मनुष्यबळ, उपकरणे आणि यासाठीची आवश्यक आर्थिक तरतूद यांची माहिती देण्यात आली आहे.

पुणे जिल्ह्यातील पालखी मार्गावर ११ रुग्णालये, ४० प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ४७ उपकेंद्रे आहेत. यापैकी १२ उपकेंद्रांमध्ये अतिदक्षता विभाग सुरू करण्याविषयी जिल्हा आरोग्य विभागाने जिल्हा मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे पत्रव्यवहार केला. पालखी मार्गावर दर दोन किलोमीटर अंतरावर उपकेंद्रात अतिदक्षता विभाग सुरू करण्याची तयारी जिल्हा आरोग्य प्रशासनाने हाती घेतली आहे.

हवेली ,दौंड, बारामती, पुरंदर, इंदापूर या पाच तालुक्यांतील १२ उपकेंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. यात फुरसुंगी, वाल्हा निरा, लोणी काळभोर, उरुळी कांचन, वरवंड, केडगाव, काटेवाडी, बिजवडी, परिंचे, होळ आणि नीरवांगी या उपकेंद्रांमध्ये वारकऱ्यांसाठी कायमस्वरूपी अतिरिक्त विभाग सुरू करणे नियोजित आहे. या अतिदक्षता विभागात प्रत्येकी पाच खाटा असतील. एका अतिदक्षता विभागासाठी सुमारे ४१ लाख रुपयांप्रमाणे १२ अतिदक्षता विभागांसाठी पाच कोटी ८८ लाख ३३ हजार ६०० रुपये इतका खर्च प्रस्तावित आहे. साहित्य आणि उपकरणांशिवाय कुशल मनुष्यबळाचीही मागणी करण्यात आली असून, यामध्ये भूलतज्ज्ञ, फिजिशियन, डॉक्टर्स, परिचारिका, परिचर यांचा समावेश असणार आहे. यंदा आरोग्य विभागाने वारीसाठी प्रथमच 'गूगल मॅपिंग क्यूआर-कोड' तयार केला आहे. यामध्ये आपल्या जवळ असणारा आरोग्य विभाग अथवा आरोग्य केंद्र, रुग्णवाहिकेची उपलब्धता, डॉक्टरांचे नाव, त्यांचा मोबाईल क्रमांक त्वरित उपलब्ध होणार आहे.

> “ वारकऱ्यांच्या सोयीसाठी यंदा प्रथमच आळंदी ते निरादरम्यान १२ अतिदक्षता विभाग सुरू करण्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळाली आहे. हे अतिदक्षता विभाग कायमस्वरुपी असून, यामुळे वारकऱ्यांना आपत्कालीन वैद्यकीय सुविधा मिळेल.तर दर दोन किलोमीटर अंतरावर त्याची सोय असणार आहे. पंढरपूरमध्ये वीस खाटांचा अतिदक्षता विभाग असून, त्या धर्तीवर पुणे जिल्ह्यातही ही सुविधा प्रस्तावित आहे. ती कार्यान्वित होण्यास विलंब होणार नाही. याशिवाय, या अतिदक्षता विभागांमध्ये प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी उपलब्ध असल्याने वारकऱ्यांना तातडीची आणि दर्जेदार आरोग्यसेवा मिळण्यास मोठी मदत होणार आहे.
>
> **– डॉ. रामचंद्र हंकारे, पुणे जिल्हा आरोग्य अधिकारी.**


Knowledge is Power
Dr. D. Y. Patil
Varale Campus
A World of Career Opportunities Awaits
Dr. SUSHANT PATIL
GROUP
A Journey towards, Innovation, Excellence, Growth & Success
शोध, नवोपक्रम, उत्कृष्टता आणि वाढीचा प्रवास.....
An Autonomous Institute - Affiliated to Savitribai Phule Pune University
POLYTECHNIC
Diploma
ENGINEERING
B. Tech | B.E.
MANAGEMENT
MBA | MCA
ARCHITECTURE
B. Arch | M. Arch
ADMISSIONS
OPEN 2026-27
Contact Us
93590 04652 | 76667 20378
76668 29653 | 78220 99218
1
KM
From Talegaon Railway Station
www.dypcoei.edu.in | www.dypimed.edu.in | www.dypatiltcs.com | www.dypatilarch.com